२४७/८

एमएमआरडीए
MMRDA

दिनांक १६/०२/२०२६

प्रति,
श्री. टी. बी. पाटील,
प्रो. मे. कोमल इंजिनिअरिंग,
१/५, कृपाली निवास, म्युनिसिपल शाळेसमोर,
भांडुप (पूर्व), मुंबई- ४०० ०४२.

विषय :- पूनमनगर पुनर्वसन वसाहतीच्या विकास आराखड्यातील मौजे मजास न.भू.क्र. १७५ अ/४ (पार्ट) येथील मनोरंजन मैदानासाठी (Recreation Ground) आरक्षित असलेल्या प्लॉटमधील त्रिचरण सप्तकर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अतिक्रमित झोपडीधारकांचे सर्वेक्षण करणेबाबत.

संदर्भ :- आपले दि.२९.११.२०१७ रोजीचे दरपत्रक.

महोदय,

प्राधिकरणाच्या, पूनमनगर पुनर्वसन वसाहतीच्या विकास आराखड्यातील प्रस्तावित उद्यानावरील (Recreation Ground) अतिक्रमित झोपडीधारकांचे सर्वेक्षण करणेकामी आपण दि.२९.११.२०१७ रोजीचे सादर केलेल्या दरपत्रकानुसार (प्रति बांधकामे २३५०/-) दि. २०/१२/२०१७ रोजी अटी व शर्तीच्या अधिन राहून आपणास कार्यादेश (Work Order) देण्यात आले होते. सदर दरपत्रकानुसार खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून आपणास सुधारीत कार्यादेश (Work Order) देण्यात येत आहेत.

**अ) सर्वेक्षणाचे क्षेत्र**

१) प्राधिकरणाच्या पूनमनगर पुनर्वसन वसाहतीच्या विकास आराखड्यातील प्रस्तावित उद्यानावरील (Recreation Ground) अतिक्रमित झोपडीधारकांचे सर्वेक्षण व बायोमेट्रीक सर्वेक्षण करणे.

२) सर्वेक्षणाच्या जागेत/क्षेत्रात वाढ/बदल झाल्यास वेळोवेळी कळविल्यानुसार सर्वेक्षणाचे कामात समावेश करावा लागेल.

**ब) सर्वेक्षणाच्या कामात अंतर्भूत असणाऱ्या बाबी**

१) प्रत्येक बाधित झोपडी/बांधकामाचे दर्शनी भागावर सहज दिसतील असे लाल रंगाच्या पुसल्या न जाणा-या ऑईल पेंटने ओळख क्रमांक (ID No) टाकणे.

२) बाधित बांधकामधारकास मूळ सर्वेक्षण नोटीस बजावणे व स्थळप्रतींवर स्वाक्षरी घेऊन स्थळप्रत प्राप्त करुन घेणे.

३) बेस लाईन सर्वे फॉर्ममधील सर्व रकाने भरुन घेणे.

४) बाधितांचे निवासी/अनिवासी/औद्योगिक बांधकामांचे पुराव्यांची कागदपत्रे प्राप्त करुन घेणे. यात विजदेयक, पाणी देयक, दुरध्वनी देयक, गुमास्ता परवाना, मालमत्ता कर पावती, बँक पासबुक, निवडणुक ओळखत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, जागेच्या मालकीसंबंधी कागदपत्रे, इत्यादी.

५) वरील कागदपत्रांसह वैयक्तीक नस्ती तयार करणे. त्यामध्ये सर्वेक्षण नोटीसची स्विकृती व बेस लाईन सर्वेक्षण फॉर्म जोडणे आवश्यक आहे.

६) प्रकल्पग्रस्तांचे त्यांच्या बांधकामासह, नाव व आयडी क्रमांकासह फोटो काढणे.

७) प्रकल्पग्रस्ताच्या ताब्यातील व बाधित होणा-या झोपडी/बांधकामाचे क्षेत्र लांबी X रुंदी चौ.फूट. मध्ये नोंदविणे.

८) सर्वेक्षणाची संपूर्ण व्हिडीओ शुटींग करुन तीन पेन ड्राईव्ह व फोटो अल्बमच्या तीन प्रती सह सादर करणे..

९) सर्वेक्षणाच्या क्षेत्रातील प्रत्येक बांधकाम दाखविणा-या कॅडस्ट्रल नकाशासह प्रकल्पग्रस्तांच्या नावांची यादी तयार करणे.



Scanned with OKEN Scanner

१०) सदर सर्वेक्षण करण्याचे काम ३ महिन्यात पूर्ण करणे. काही कारणास्तव सर्वेक्षणाचे कामात विलंब झाल्यास विलंब कालावधी आवश्यकतेनुसार वाढविण्यात येईल आणि सदर प्रलंबित काम मंजूर खर्चातच करावे लागेल.

**क) अटी व शर्ती**

१) सर्वेक्षणासाठी नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या नावासह सर्वेक्षणाच्या कामाचा प्रगती अहवाल दर आठवड्याला प्रमुख, सामाजिक विकास कक्ष यांना सादर करणे.

२) सर्वेक्षणाच्या कामासाठी वापरण्यात येणारी यंत्रणा व कर्मचारी यांच्या संरक्षणाची जबाबदारी आपली राहील. यासाठी प्राधिकरण जबाबदार राहणार नाही व अतिरिक्त खर्चही मान्य करणार नाही.

३) सर्वेक्षण करतांना प्रकल्प बाधितांना पुनर्वसन/पुनर्वसनाचे ठिकाण/क्षेत्र इत्यादी बाबत प्राधिकरणाच्या वतीने कोणतेही प्रलोभन/आश्वासन देऊ नये. सर्वेक्षणाच्या कार्यात स्थानिक पातळीवर कोणताही अडथळा झाल्यास सदर बाब सर्व तपशीलांसह तात्काळ लेखी प्राधिकरणाच्या निदर्शनास आणावी.

४) प्राधिकरणाच्या सूचनेनुसार व प्राधान्यतेनुसार सर्वेक्षणाचे काम करणे.

५) अ) सर्वेक्षणाच्या कामाचा संपूर्ण अहवाल सादर केल्यानंतर रक्कम अदा करण्यात येईल.

ब) खर्चाच्या एकूण देय रक्कमेवर नियमानुसार टी. डी. एस. ची रक्कम वळती करुन अंतिम रक्कम देण्यात येईल.

क) देय कर जसे की, जी. एस. टी. इत्यादी करांचा भरणा करण्याची जबाबदारी आपली राहील.

६) सर्वेक्षण करताना नवीन झोपड्या बांधल्या जात असल्याचे अथवा अस्तित्वातील झोपड्यांमध्ये विभाजन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर बाब सर्व तपशीलांसह तात्काळ लेखी प्राधिकरणाच्या निदर्शनास आणावी. वादातील झोपड्या/बांधकामे न्यायप्रविष्ट असल्यास सविस्तर माहिती व सद्यस्थिती याबाबत स्वतंत्र अहवाल सादर करावा.

७) न बजावलेल्या / अस्विकृत सर्वेक्षण नोटीसा कामाच्या पूर्ततेसोबत प्राधिकरणाकडे परत करणे आवश्यक राहील.

८) विहित कालावधीत सर्वेक्षण व वर नमूद केलेल्या बाबी, वा त्यापैकी काही बाबी पूर्ण न केल्यास, वा विलंबासंबंधी योग्य ते कारण न दिल्यास खर्चाच्या एकूण रक्कमेवर किंवा विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी दंड आकारणीचा अधिकार प्राधिकरण आपलेकडे सुरक्षित ठेऊन योग्य वेळी वापर करील.

९) सर्वेक्षणाचे काम संमाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर व या पत्रात नमूद केल्यानुसार फोटो अल्बम, सी.डी. फोटोसह प्रकल्पबाधितांच्या नावासह संगणकीय याद्या प्राप्त झाल्यानंतर, त्यांची तपासणी व केलेल्या कामाचे मुल्यमापन होऊन प्राधिकरणाचे समाधान झाल्यानंतर रक्कम अदा करणेत येईल.

(शिवाजी दावभट) 16/2
अपर जिल्हाधिकारी तथा
प्रमुख सामाजिक विकास कक्ष

Received.
१६।०२।२६
(Komal. Engineering)
Prop.

Scanned with OKEN Scanner